N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** मौदा **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0610 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/12/2020 22:00 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 08/12/2020

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/12/2020

**Time From (वेळेपासून):** 16:38 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/12/2020 **Time (वेळ):** 21:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/12/2020 21:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 18 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय वरंभा,कामठी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बुद्धदास चंद्रभान पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

## फिर्याद

अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक ०८/१२/२०२०

मी बुद्धदास चंद्रभान पाटील, वय ३२ वर्षे, व्यवसाय– शेती रा. वरंभा पोस्ट. अंबाडी ता. कामठी जिल्हा. नागपूर मो.नं. ९९२३१६३८२८

मी वर दिलेल्या पत्त्यावर राहत असुन दि. ०१.१२.२०२० रोजी पोलीस निरीक्षक योगिता चाफले, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने हस्तलिखीत तक्रार दिली. पोलीस निरीक्षक योगिता चाफले, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझी हस्तलिखीत तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर माझी सही घेतली. माझी हस्तलिखीत तक्रार खालील प्रमाणे आहे.

''मी समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय नागपूर येथे येवून आपली तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्त्यावर राहात असुन शेती करतो.

माझे आजोबा डोमा तुळशीराम पाटील यांनी दि. ०४/०८/२०१६ रोजी आपले मृत्युपत्र लिहुन ठेवले होते. मृत्युपत्रानुसार मौजा झरप येथील त्यांचे नावे असलेली ३.४० हे.आर. शेती पैकी माझा मोठा भाऊ राहुल पाटील यांचे नावावर व माझे नावावर प्रत्येकी १.७० हे.आर अशी वाटणी करून ठेवली होती.

दि. २५/०९/२०२० रोजी माझे आजोबा डोमा पाटील यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांचे मृत्युपत्राप्रमाणे माझे व माझे भावाचे नावे आलेल्या मौजा झरप येथील शेतीचा फेरफार करून शेतीचे ७/१२ वर नाव चढविण्याकरीता लागणारे कागदपत्रे घेवून दि. १३/११/२०२० रोजी वरंभा येथील तलाठी कार्यालय येथे जावून तलाठी श्री. आशिष गोगलवार यांची भेट घेतली असता. त्यांनी मला म्हटले की, जर तुला तुझ्या आजोबाचे मृत्युपत्राप्रमाणे मौजा झरप येथील मिळालेल्या शेतीचा फेरफार करून ७/१२ वर नाव चढवायचे असेल तर तुम्हाला मला ५०,०००/– रूपये द्यावे लागतील. अन्यथा तुमचे काम होणार नाही. त्यावर मी त्यांना ५०,०००/– रूपये जास्त होतात असे म्हटले व तेथुन निघुन गेलो.

माझ्या आजोबांनी तयार केलेल्या मृत्युपत्राप्रमाणे माझे व माझे भावाचे नावे आलेल्या मौजा. झरप येथील शेतीचा फेरफार करून शेतीचे ७/१२ वर नाव चढविण्याकरीता तलाठी कार्यालय वरंभा येथील श्री. आशिष गोगलवार यांनी मागितलेली लाच रक्कम रू. ५०,०००/– देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने, मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर येथे येवून तक्रार देत आहे. सदर कामाकरीता वरील प्रमाणे लाच रक्कम माझे कडे उपलब्ध नाही व एवढया रकमेची मी सध्या जुळवा जुळव सुध्दा करू शकत नाही. त्यामुळे मी माझे वैयक्तिक बचतीतले रू.१०,०००/– कार्यवाही करीता हजर करीत आहे. तसेच शेतीचे फेरफार करणेकरीता लागणाऱ्या कागदपत्रांची छायांकित प्रत यासोबत सादर करीत आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन, तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर मी सापळा कार्यवाही करीता माझे कडे असलेले रुपये १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० चलनी नोटा) पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांचेकडे जमा केले. गैरअर्जदार यांनी मागीतलेली लाच रक्कम रू. ५०,०००/–माझेकडे उपलब्ध नसल्याने तसेच गै. अ. हे कमी रकमेची लाच स्विकारणार नाहीत असे मी सांगीतल्याने, पोलीस निरिक्षक योगिता चाफले, मी व दोन्ही पंच असे आम्ही सर्वानुमते नोटा सदृश्य खेळण्यातील वापरण्यात येणाऱ्या नोंटाचा वापर करून लाच रक्कम तयार करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी जमा केलेले रू. १०,०००/– तसेच, नोटा सदृश्य खेळण्यातील

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरंभा,कामठी,मौदा,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरंभा,कामठी,मौदा,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आशिष अरूण गोगलवार | | | 1. हमु प्रथमेश अपार्टमेंट फ्लॅट, सिद्धेश्वर सभागृहाजवळ मानेवाड,अजनी ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील नमुद घटना दिनांक 08/12/2020रोजी चे वेळ 16/38वाजता यातील घटना ठिकाण तलाठी कार्यालय ग्रामपंचायत वरंभा या ठिकानी आलोसे आशिष अरूण गोगलवार वय-34वर्ष पद-तलाठी साझा क्रं. 29 मौजा वरंभा तहसील कार्यालय कामठी जि.नागपुर रा.ह.मु. प्रथमेश अपार्टमेंट फ्लॅट नं.303 सिद्धेश्वर सभागृहाजवळ मानेवाडा रोड नागपुर मुळ पत्ता गांधी वार्ड पांढरकवडा ता. केळापुर जि.यवतमाळ यांनी आपले लोकसेवक पदाचा स्वताचे आर्थिक लाभाकरीता गैरवापर करून फिर्यादी नामे बुद्धदास चंद्रभान पाटील वय-32वर्ष व्यवसाय-शेती रा.वरंभा पोस्ट आंबाडी ता.कामठी यास त्याचे आजोबांनी तयार केलेल्या मृत्युपत्राप्रमाणे फिर्यादीचे व त्याचे भावाचे नावे आलेल्या मौजा झरप येथील शेतीचा फेरफार करून शेतीचे 7/12वर नाव चढविण्याकरीता लाच रक्कम 50,000/रू. ची मागणी करून स्वता स्विकारले वरून फिर्यादी यांचे लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नमुद कलमांन्वये नोंद करून तपासात घेतला.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): VIJAYSINGH GULAJARSINGH THAKUR
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** POBN54542 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

वापरण्यात येणाऱ्या रू. ५००/– च्या ८० नकली नोटा असे रू. ४०,०००/– अशा एकुण रू. ५०,०००/– च्या नोटा उपलब्ध करण्यात आल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत शासकीय पंचांना व मला सविस्तर माहिती दिली. सापळा कार्यवाही दि. ०४.१२.२०२० रोजी वरंभा ता. कामठी जि. नागपूर येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येवून मला दि. ०४.१२.२०२० रोजी वरंभा येथे हजर राहण्याबाबत सुचना देवून वरंभा करिता रवाना केले. सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर दि. ०४.१२.२०२० रोजी अंदाजे १२.१५ वा. दरम्यान पोनि. योगिता चाफले यांचा मला माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन करून नागपूर येथून वरंभा करिता निघाल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि. योगिता चाफले यांनी मला फोन करून वरंभा गावाजवळ बोलाविले. त्यामुळे मी लगेच माझे दुचाकीने पोहोचलो तेथे पोलीस निरीक्षक योगिता चाफले हे सापळा पार्टीसह हजर मिळून आले. त्यानंतर गोपनियतेच्यादृष्टीने सापळा पार्टी यांना वरंभा गावाजवळ असलेल्या माझे शेतात घेवून गेलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचासमक्ष गैरअर्जदार यांची लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ १४.०० वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला गै.अ. आशिष गोगलवार यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे दुचाकीने पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह कार्यालय ग्रामपंचायत वरंभा येथे गेलो असता, तेथे गैरअर्जदार गोगलवार हे हजर मिळून आले. गैरअर्जदार गोगलवार यांनी माझ्या आजोबांनी तयार केलेल्या मृत्युपत्राप्रमाणे माझे व माझे भावाचे नावे आलेल्या मौजा. झरप येथील शेतीचा फेरफार करून शेतीचे ७/१२ वर नाव चढविण्याकरीता लाच रक्कम रू. ५०,०००/– ची मागणी करून दि. ०७.१२.२०२० रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर वेळ १४.२५ वा. पोलीस निरीक्षक श्री. योगिता चाफले व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर दि. ०७.१२.२०२० रोजी अंदाजे ११.१५ वा. दरम्यान पोनि. योगिता चाफले यांचा मला माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन करून नागपूर येथून वरंभा करिता निघाल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि. योगिता चाफले यांनी मला फोन करून वरंभा गावाजवळ बोलाविले. त्यामुळे मी लगेच माझे दुचाकीने पोहोचलो तेथे पोलीस निरीक्षक योगिता चाफले हे सापळा पार्टीसह हजर मिळून आले. त्यानंतर गोपनियतेच्यादृष्टीने सापळा पार्टी यांना वरंभा गावाजवळ असलेल्या माझे शेतात घेवून गेलो. पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याअगोदर गैरअर्जदार गोगलवार हे त्यांचे कार्यालयात हजर आहे अगर कसे? याबाबत माहिती घेतली असता गैरअर्जदार हे दि. ०७.१२.२०२० त्यांचे कार्यालयात येणार नसून दि. ०८.१२.२०२० रोजी येणार असल्याचे कळाले. त्यामुळे सापळा कार्यवाही दि. ०८.१२.२०२०. रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचनामा क्र. ३ मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर दि. ०८.१२.२०२० रोजी अंदाजे ११.२५ वा. दरम्यान पोनि. योगिता चाफले यांचा मला माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन करून नागपूर येथून वरंभा करिता निघाल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि. योगिता चाफले यांनी मला फोन करून वरंभा गावाजवळ बोलाविले. त्यामुळे मी लगेच माझे दुचाकीने पोहोचलो तेथे पोलीस निरीक्षक योगिता चाफले हे सापळा

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

B. C. Patil

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): MADHUKARRAV SHRIPATH GI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN70662

तारीख 8/12/2020

दाखल NPC/2023

PS/

(ग्रा)

पार्टीसह हजर मिळून आले. त्यानंतर गोपनियतेच्यादृष्टीने सापळा पार्टी यांना वरंभा गावाजवळ असलेल्या माझे शेतात घेवून गेलो. पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेले रू. ५००/— दराच्या एकुण २० नोटा असे १०,०००/— तसेच नोटा सदृश्य खेळण्यातील वापरण्यात येणाऱ्या रू. ५००/— च्या ८० नकली नोटा असे ४०,०००/— अशा एकुण रू. ५०,०००/— मला देण्यात आले. त्यानंतर वेळ १३.२६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह कार्यालय ग्रामपंचायत वरंभा येथील गैरअर्जदार गोगलवार यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याकरिता माझे दुचाकी वाहनाने रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ ग्रामपंचायत वरंभा येथे पोहोचलो असता, तेथे गैरअर्जदार गोगलवार हे त्यांचे कार्यालयात हजर होते. गैरअर्जदार गोगलवार यांचेशी कामाविषयी बोलणी केली परंतु कार्यालयात गर्दी असल्याने गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्विकारण्याकरिता नंतर फोन करून बोलावितो असे सांगीतले. त्यामुळे मी तेथून निघून कार्यालय ग्रामपंचायत वरंभाचे परीसरातच थांबून होतो. त्यानंतर बऱ्याच वेळाने गैरअर्जदार गोगलवार यांनी मला फोन करून त्यांचे कार्यालयात लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतले. त्यामुळे कार्यालय ग्रामपंचायत वरंभा येथील गैरअर्जदार गोगलवार यांचे कार्यालयात गेलो असता, गैरअर्जदार गोगलवार यांनी माझेकडून लाच रक्कम रू. ५०,०००/— स्विकारले. सापळा पथकास मी माझे डोक्यावर बांधून असलेला दुपट्टा काढून चेहरा पूसून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गैरअर्जदार आशिष गोगलवार यास रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांनी पंचनामा क्र. ४ मध्ये घेतल्या आहेत.

तरी आरोपी आशिष अरूण गोगलवार वय ३४ वर्ष पद—तलाठी साझा क्र. २९ मौजा वरंभा तहसील कार्यालय कामठी जि. नागपूर रा. ह.मु. प्रथमेश अपार्टमेंट फ्लॅट नं. ३०३ सिध्देश्वर सभागृहाजवळ मानेवाडा रोड नागपूर मुळ पत्ता—गांधी वार्ड पांढरकवडा ता. केळापूर जि. यवतमाळ यांनी आपले लोकसेवक पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता गैरवापर करून मला माझ्या आजोबांनी तयार केलेल्या मृत्युपत्राप्रमाणे माझे व माझे भावाचे नावे आलेल्या मौजा झरप येथील शेतीचा फेरफार करून शेतीचे ७/१२ वर नाव चढविण्याकरीता लाच रक्कम रू. ५०,०००/— ची मागणी करून स्वत: स्विकारले म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन त्याची प्रींट काढुन मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्वा/—
**(योगिता चाफले)**
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( if known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**